# प्रसिध्दीपत्रक

**विषय:- ऑगस्ट-२०१६ मध्ये घेण्यात येणाऱ्या जीसीसी-टिबीसी ३० श.प्र.मि. प्रि-लिस्ट मध्ये ऑनलाईन दुरुस्ती करणे आणि परीक्षा केंद्राचे ठिकाण निवडणेबाबत..**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-०१ यांचे मार्फत ऑगस्ट-२०१६ मध्ये घेण्यात येणाऱ्या GCC-TBC ३० WPM या परीक्षेसाठी आवेदनपत्र भरलेल्या विद्यार्थ्यांची ऑनलाईन प्रि-लिस्ट संस्थांना त्यांच्या Loginद्वारे परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यानुसार दि. २६ जुलै ते २८ जुलै २०१६ या कालावधीत ऑनलाईन दुरुस्ती करावी. याबाबत पुढील सूचनांप्रमाणे कार्यवाही करावी.

१) विद्यार्थ्याचे नाव पूर्णपणे बदलता येणार नाही, नावातील स्पेलींग दुरुस्ती करता येईल.
२) फोटो चुकीचा अपलोड झाला असल्यास नव्याने फोटो (JPG IMAGE) अपलोड करावा, मात्र त्याची साईज ३० KB पेक्षा जास्त नसावी.
३) विषयातील दुरुस्ती (मराठी /हिंदी/इंग्रजी) करता येईल.
४) चुकीची सही अपलोड झाली असल्यास दुरुस्ती करता येईल (नव्याने स्कॅन इमेज अपलोड करावी) मात्र त्याची साईज १५ KB पेक्षा जास्त नसावी.
५) कागदोपत्री (ऑफलाईन) दुरुस्ती केली जाणार नाही. दुरुस्त्या परीक्षा परिषदेकडे टपालाने अथवा ई-मेलद्धारे पाठवू नये. पाठविल्यास त्याची दखल घेतली जाणार नाही.
६) परीक्षा केंद्राचे ठिकाण ड्रॉपडाऊन लिस्टमधून निवडावे (मात्र निवडलेल्या ठिकाणी विद्यार्थी संख्या पुरेशी नसल्यास जवळच्या परीक्षा केंद्रावर बैठक व्यवस्था करण्यात येईल.)

उपरोक्त सूचनांनुसार प्रि-लिस्टमधील दुरुस्ती करण्याची व परीक्षा केंद्राचे ठिकाण निवडण्याची कार्यवाही संबंधित संस्थाचालक / प्राचार्य यांनी विहीत कालावधीत करावी.

(आर.व्ही.गोधने)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-०१.

पुणे, दि. २५ जुलै २०१६

C:\Documents and Settings\NET\Desktop\New Folder (2)\GCC TBC EXAM 2016\Computer typing\PRESS NOTE.docx